2017-18

मराठा विद्या प्रसारक समाजाचे,

कर्मवीर पुंजाबाबा गोवर्धने कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, इगतपुरी

व

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

गुणवत्तासुधार कार्यक्रमांतर्गत

## दोन दिवसीय मराठी विषयाचे राष्ट्रीय चर्चासत्र

दि. 29 व 30 जानेवारी 2018

# आदिवासी साहित्य

प्रमुख संपादक

प्राचार्य डॉ. एस. एस. काळे

संपादक

प्रा. देविदास गिरी

प्रा. डॉ. श्रीमती एस. ए. इंगळे

प्रा. बी. यू. पवार

**Electronic Interdisciplinary International Research Journal (EIIRJ)**

**A Peer Reviewed Interdisciplinary Journal**

**UGC Approved Journal No 48833**

**Impact Factor 5.20** **ISSN : 2277-8721**

दोन दिवसीय मराठी विषयाचे राष्ट्रीय चर्चासत्र

दि. 29 व 30 जानेवारी 2018

# आदिवासी साहित्य

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

गुणवत्तासुधार कार्यक्रमांतर्गत व

कर्मवीर पुंजाबाबा गोवर्धने कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

इगतपुरी, ता. इगतपुरी, जि. नाशिक

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित


| | | |
|---|---|---|
| प्रमुख संपादक | : | प्राचार्य डॉ. एस. एस. काळे |
| संपादक | : | प्रा. देविदास गिरी |
| | | प्रा. डॉ. श्रीमती एस. ए. इंगळे |
| | | प्रा. बी. यू. पवार |

| | | | |
|---|---|---|---|
| 14 | प्रा. सुदाम नारायण राठोड | आदिवासी समाज आणि संस्कृती | 78 ते 79 |
| 15 | गिरीष यशवंत गायकवाड | गोपाळदेवाची कथा | 80 ते 85 |
| 16 | डॉ. संजय शिंदे | आदिवासी साहित्य, स्वरुप व भूमिका | 86 ते 90 |
| 17 | प्रा. मधुचंद्र एल. भुसारे | आदिवासी कोकणा बोलीभाषेतील लोकगीतामधील अलंकार योजना | 91 ते 98 |
| 18 | प्रा. प्रदिप विष्णु देशपांडे | आदिवासी साहित्य आणि आदिवासी चळवळ | 99 ते 103 |
| 19 | डॉ. स्नेहल संजय मराठे | आदिवासी साहित्याचे स्वरुप | 104 ते 108 |
| 20 | प्रा. हिरा वाघ | आदिवासी साहित्य (महाराष्ट्र साहित्य अकादमी पुरस्कार 1989) | 109 ते 112 |
| 21 | प्रा. स्मिता ओंकारराव माळवे | आदिवासी मराठी साहित्य – काव्यातून प्रकट होणारे आदिवासी जीवन (काही निवडक काव्यसंग्रह) | 113 ते 117 |
| 22 | प्रा. संदिप शिवाजी क्षीरसागर | आदिवासी साहित्य व स्वरुप | 118 ते 120 |
| 23 | पुंजाजी मालुंजकर | आदिवासी साहित्य व स्वरुप | 121 ते 123 |
| 24 | संजय देवधर | वारली चित्रसृष्टी : काल, आज, उद्या आदिवासी साहित्याची कलात्मक किनार | 124 ते 126 |
| 25. | डॉ. वेदश्री विजय थिगळे | आदिवासी साहित्य | 127 ते 137 |
| 26. | डॉ. आनंद शामराव बल्लाळ | आदिवासी रंगभूमी : स्वरुप व वैशिष्टये | 138 ते 141 |

# आदिवासी साहित्याचे स्वरुप

**डॉ. स्नेहल संजय मराठे**

*सहाय्यक प्राध्यापक (मराठी विभाग), म.स.गा. महाविद्यालय, मालेगांव कॅम्प,*

*मालेगांव, जि.नाशिक*

**प्रास्ताविक :**

साहित्य हे समाजाचे दर्पण असते. साहित्य समाजाला प्रेरणा देत असते. ज्या ज्या देशात क्रांती झाली त्या त्या देशात प्रेरणादायी साहित्याची निर्मिती झाली. म्हणूनच साहित्य राष्ट्र समाजसापेक्ष असते. समग्र मराठी वाङ्मयाचा अभ्यास केल्यानंतर असे आढळते की, संत साहित्य आणि शाहिरी वाङ्मयाचा अपवाद काळता अगदी १९६० पर्यंत मराठी वाङ्मय एका विशिष्ट अभिजन वर्गाच्या प्रभुत्वासाठी लिहिले-वाचले आणि गौरविलेही जात होते. दलित, आदिवासी, भटके-विमुक्त, ग्रामीण, श्रमिक, कामगार, स्त्रिया, मुस्लिम, ख्रिश्चन, जैन, बौद्ध या आणि अशा अशिक्षित, उपेक्षित समाजवर्गाचे जगणे आणि भोगणे वाङ्मयाचा विषय होऊ शकला नव्हता. मात्र १९६० नंतर ही सर्व बंधने झुगारुन दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, जनवादी वाङ्मय प्रवाहांसोबतच आदिवासी वाङ्मयाचा नवा आविष्कार मराठीत शब्दांकित झाला. यामुळे आधुनिक मराठी साहित्य समृद्ध झाले. दलित साहित्य, ग्रामीण साहित्य हे प्रवाह फुले-शाहू-आंबेडकरी प्रेरणेने जोमाने पुढे आले; परंतु आदिवासी साहित्याचा प्रवाह मात्र इतक्या जोमाने पुढे सरकत असल्याचे दिसत नाही आदिवासी साहित्य फुले-आंबेडकर-बिरसा मुंडा यांच्या प्रेरणा मानते. रानावनात राहणारे आदिवासी भारतीय भूमीतले मूळ रहिवासी आहेत. महाराष्ट्रात आदिवासींची एकूण लोकसंख्या ५७ लाख आहे. भारतात आठ टक्के लोकसंख्या आदिवासींची आहे. इतर राज्यांतील एकूण आदिवासी लोकसंख्येच्या मानानं अधिक संख्येने आदिवासी महाराष्ट्रात भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, अमरावतील, यवतमाळ, धुळे, नासिक, ठाणे, रायगड इत्यादी जिल्हयांत आदिवासींचे प्रमाण अधिक आढळते. त्यात धुळे जिल्हा आदिवासी लोकसंख्येबाबत महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर आहे. या जिल्हयात भिल्ल, कोकणी, गावीत, पावरा आदि जमाती आहेत. तापी व नर्मदा नद्यांच्या मधील सातपुडा क्षेत्रांत आदिवासी पावरा लोक राहतात. आदिवासींमध्ये गोंड, कोरकू, बंजारा, महादेव कोळी, ठाकूर, भिल्ल, राजगोंड, परधान, हलबा, कँवर, कोलाम, पावरा, तडवी, लमाणी, पारली, कातकरी, कोकणा, ठाकर, मल्हारकोळी, धोंडिया, दुबळा, गावीत, मावची, धनका, आंध, काथोळी अशा जमातींचा समावेश आहे.

**आदिवासी म्हणजे कोण ?**

अनादि कालापासून म्हणजे पाषाणयुगापासून आजपर्यंत जगातल्या कोणत्याही मानवाचा जीवनप्रवास हेच

Electronic Interdisciplinary International Research Journal (EIIRJ)
A Peer Reviewed Interdisciplinary Journal
Impact Factor 5.20
UGC Approved Journal No 48833
ISSN 2277-8721

दर्शवितो की, जगाच्या कोणत्या ना कोणत्यातरी भूभागावर मानव आपले पाय रोवून स्थिर होऊ लागला. काहींनी निसर्गाचे वरदान लाभलेल्या लहान लोकवस्तीची खेडी राहण्यासाठी पसंत केली तर काहींनी शहराकडे धाव घेतली; परंतु काही लोकांनी शहरे व खेडी याकडे धाव न घेता, दूरवर दुर्गम डोंगरकपारीत व जंगलाच्या नद्या, नाले, पर्वत, दऱ्याखोऱ्या यांच्या सान्निध्यात आपले संसार उभारले. त्यांनाच खऱ्या अर्थाने आदिवासी म्हणावे. आदिवासी हा इंग्रजीतील 'ॲबेरिजिनीस' या शब्दाचा रुढ मराठी पर्याय आहे. 'प्रिमिटिव्ह' म्हणजे आदिम अप्रगत आणि 'सॅव्हेज' म्हणजे मागासलेले किंवा रानटी लोक. 'सॅव्हेज' या शब्दातून आदिवासींचा अज्ञानी व भोळेपणा दिसून येतो. आदिवासी समाजाच्या एकूण जीवनासंबंधी अनेक विचारवंतांनी आपली मते नोंदविलेली आहेत.

१) नागर संस्कृतीपासून दूर व अलिप्त राहिलेले संबंधित प्रदेशातील मूळचे रहिवासी म्हणजे आदिवासी होय.
२) आर्य व द्रविड हे भारतातील दोन मोठे मानव समाज सोडून त्यांच्याही पूर्वी भारतात राहणाऱ्या, किंबहुना बाहेरील देशातून येऊन सध्या वने व पर्वत आदींच्या आश्रयाने स्थायिक झालेल्या जमातींना 'आदिवासी' असे म्हणतात.

वरील परिभाषांवरुन असे आकलन होते की, आदिवासी समूह हा समान बोली बोलणारा, वन व दऱ्याखोऱ्यात वास्तव करणारा. नागरसंस्कृतीपासून दूर राहणारा समूह आहे. निसर्गाच्या सान्निध्यात या जमातीचे वास्तव्य असल्यामुळे या जमातीची संस्कृती निसर्गाधिष्ठित आहे.

**आदिवासी साहित्य म्हणजे काय ?**

मानवतावादी दृष्टिकोनातून, सहानुभूती म्हणून आदिम जमातींबद्दलचा कळवळा म्हणून अनेक आदिवासीत्तर साहित्यिकांनी आदिवासी जीवनविश्व आपल्या साहित्यकृतींचा विषय केलेला आहे. आदिवासी जमातींच्या धर्म, परंपरा, रुढी रीतिरिवाज, विवाहसंस्था, जातपंचायत, सण, उत्सव, त्यांच्या जीवनातील दारिद्रय, भूक, विषमता, अन्याय, अत्याचार, त्यांचा व्यवसाय, उद्योगधंदा, त्यांचे सांस्कृतिक जीवन, शैक्षणिक व कौटुंबिक जीवन, त्यांची अर्थव्यवस्था, त्यांचे आरोग्य, अंधश्रध्दा या सर्वांबाबत जन्मजाम आदिम जमातीमध्ये जन्म घेऊन संवेदनशीलतेने साहित्यनिर्मिती करणारे प्रतिभावंत आदिवासी साहित्यिक आहेत.

मध्यमवर्गीय, पांढरपेशा जीवन अनुभव विश्वापेक्षा, मध्यमवर्गीय परिघाबाहेरील जीवनविश्वाचा वेध आदिवासी साहित्य घेते. गावकुसाच्या बाहेरील अतिदूर, डोंगरी, दुर्गम, दऱ्याखोऱ्यात, जंगल पहाडात, निसर्ग आणि जंगलाच्या सान्निध्यात राहणाऱ्या विविध जाती-जमातींच्या जीवन जगण्याचे विविध पदर म्हणजे आदिवासी साहित्य होय. अर्वाचीन मराठी साहित्याच्या ज्या प्रेरणाप्रवृत्ती आहेत त्या या साहित्यप्रवाहाच्या नाहीत. आदिवासी साहित्याच्या प्रेरणा प्रवृत्ती मात्र अस्सल मराठी आहेत. मराठी मातीचा सुगंध, आदिमतेच भानं, आदिमतेची वैशिष्ट्ये प्राप्त झालेले हे साहित्य आहे. शेकडो वर्षांच्या साहित्य परंपरेमध्ये ज्यांचे जीवन कधी साहित्याचा

विषयच झाला नाही. अशा उपेक्षित, वंचित, दुर्लक्षित, आदिमता प्राप्त झालल्या विविध जाती-जमातींच्या जनसमूहांच्या आक्रोशाचा शाब्दिक आविष्यकार म्हणजे आदिवासी साहित्य होय.

**स्वरुप :**

१९६० नंतरच्या शिक्षणाच्या सार्वत्रिक प्रसारामुळे खेडयापाडयांपर्यंत डोंगरदऱ्यांमध्ये परिवर्तनाची लाट निर्माण झाली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांच्या प्रेरणेतून ग्रामीण साहित्य प्रवाह, दलित साहित्य प्रवाह याबरोबरच आदिवासी साहित्याचा प्रवाह सुरु झाला आणि मराठी साहित्याला अपरिचित असलेल्या आगळेवेगळे विश्व साकारले गेले. परिवर्तनाची जाण, समाजसन्मुखता प्रस्तापित व्यवस्थेच्या विरोधातील अस्वस्थची जाणीव, वंश-जात-कर्मकांडांच्या जहरी अस्मितांच्या विरोधातील विद्रोहाची भावना, 'स्व' च्या अस्तित्वाची जाण, आलेले आत्मविश्वास व आत्मबळाचे वाढलेले सामर्थ्य यांनी परिपोषण झालेल्या आदिवासी साहित्याने मराठी साहित्याच्या कक्षा व्यापक केल्या आहेत.

'आदिवासी जाणीव' हा साहित्याचा प्रमुख विशेष मानला जातो. आदिवासींच्या जीवनावर आदिवासी आणि आदिवासीएत्तर साहित्यिकांनी साहित्य लेखन केल्याचे दिसून येते. काव्याच्या क्षेत्रात भुजंग मेश्राम, वाहरु सोनवणे, डॉ.विनायक तुमराम, उषाकिरण आत्राम, सुनिल कुमरे, चामुलाल राठवा, कृष्णकुमार चांदेकर, प्रा.वामन शेळमाके यांनी महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. कादंबरीच्या क्षेत्रात बाबाराव मडावी, माधव सरकुंडे या आदिवासी लेखकांबरोबरच दुर्गा भागवत, मधुकर वाकोडे, सुरेश द्वादशीवार, दीनानाथ मनोहर, गो.ना.मुनघाटे, अॅड.एकनाथ साळवे, डॉ.अनिल सहस्त्रबुद्धे यांनी आपल्या कादंबरी विश्वातून आदिवासी जीवनचित्र साकारले आहे. नजुबाई गावीत यांनी आत्मचरित्रामध्ये स्वतःच्या जीवनसंघर्षाबरोबरच आदिवासींचे सामाजिक वास्तविक आणि स्त्री संघर्ष चितारलेला आहे. आदिवासी कथा, नाटक या साहित्यप्रकाराचे लेखन होऊ लागले आहे. आदिवासी साहित्य चळवळी, संघटन, आदिवासी साहित्य संमेलने यांमुळे आदिवासींमध्ये साहित्यविषयक जाणीवांचा विकास होऊन त्यांच्यामध्ये मानवी जीवनविषयक जाणीव, प्रस्थापित समाजातील विषमता, त्यांचे होणारे शोषण, विकासासंदर्भात नियोजन, त्यांचे मुलभूत प्रश्न याविषयी साहित्यामुळे आत्मभान निर्माण होऊ लागले आहे.

**आदिवासी साहित्याची वैशिष्टये :**

आदिवासी साहित्यातून व्यक्त होणाऱ्या वेदनेचे, नकाराचे, विद्रोहाचे रुप सर्व बाबतीत खरे उतरते. एकूणच कथा, कादंबरी, कविता, नाटय या साहित्य प्रकारातून जी वैशिष्टये जाणवतात. ती पुढीलप्रमाणे-

१) आदिम जमातींच्या दुःख, व्यथा चित्रित करणारे हे साहित्य आहे.

२) आदिवासी गुलामगिरीच्या बेडया तोडून टाकण्यास हे साहित्य सिद्ध आहे.

UGC Approved Journal No 48833
ISSN 2277-8721

३) आदिम जीवनसंघर्ष व आदिम जीवनाची वाताहत सांगणारे हे साहित्य आहे.
४) आदिवासी जमातींच्या बोलीभाषेत हे साहित्य प्रकट होते.
५) दलित आणि आदिवासी साहित्य प्रवाहांमध्ये भिन्नत्वाचे नाते आहे.
६) अन्यायग्रस्त व विस्थापितांच्या बाजूने उभे राहणारे हे साहित्य आहे.
७) आदिम समाजाची व्यथा, वेदना, आक्रोश, संताप व्यक्त करणारे हे साहित्य आहे.
८) आदिवासी साहित्यात आदिम जमातीवर जमीनदार, भांडवलदार वर्गांकडून होणाऱ्या अन्याय-अत्याचाराचे वर्णन आहे.
९) भारतीय समाजजीवन व्यवस्थेतील अत्यंत उपेक्षित जीवनस्तरातील सामाजिक दुर्दशा आदिम साहित्यातून जाणवते.
१०) दलित साहित्य व आदिवासी साहित्याची वैशिष्टये समसमान आहेत. दोन्ही साहित्यप्रवाहाचे ध्येयही समान आहे.

**आदिवासी साहित्याचे वेगळेपण :**

आदिवासी साहित्याला इतर मराठी साहित्यापेक्षा वेगळेपण प्राप्त करुन देणारी काही ठळक वैशिष्टये पुढीलप्रमाणे आहेत-

१) व्यथा, वेदना विद्रोह, नकार ही या साहित्याची ठळक लक्षणे आहेत.
२) समूहनिष्ठा हे या संज्ञेचे गुणवैशिष्टय आहे.
३) वनसंस्कृती व रानजागराचा उद्घोषण या संज्ञेत आहे.
४) स्वातंत्र्योत्तर नवशिक्षितांना आत्मभान प्राप्त झाले. अस्मिता जागर झाला आहे.
५) खास देशी संकल्पना आहे.
६) निसर्गावलंबित्व, निसर्गपूजा, निसर्गातील वास्तवता ही त्यांची खरी ओळख आहे.
७) सांस्कृतिकता व एकजिनसीपणा टिकवून ठेवणारी ही संज्ञा आहे.
८) या संज्ञेला समाजपरिवर्तनाची आस आहे.
९) शिक्षण व आधुनिक संस्कारांमुळे आज आदिवासी या संज्ञेत बदल होत आहे.

**समारोप :**

'आदिम समाज हा स्वतः आपल्या भाग्याचा शिल्पकार आहे'. ही वास्तविकता लक्षात घेऊन आदिमांचे आत्मबल एकवटले जावे हे आदिवासी साहित्याचे प्रयोजन ठरु शकते. आदिवासी साहित्य संस्कृती, परंपरा जपते व येणाऱ्या पिढीसमोर नवा आदर्श निर्माण करुन देण्याचे काम करते. जागतिकीकरणामुळे आदिवासींची संस्कृती,

लोकपरंपरा, त्यांच्या बोलीभाषा संकटात सापडल्या आहेत. त्यांची मरणाकडे वाटचाल सुरु झालेली आहे. याची जाणीव आदिवासी साहित्यातून आविष्कारीत झालेली आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


१) 'आदिवासी मराठी साहित्य : स्वरुप आणि समस्या' संपा.डॉ.प्रमोद मुनघाटे, प्रतिमा प्रकाशन, नागपूर

२) 'आदिवासी साहित्यविचार' : डॉ.गोविंद गारे

३) 'आदिवासी साहित्य' : डॉ.धनाजी गुरव

४) 'आदिवासी साहित्य : एक अभ्यास' : डॉ.ज्ञानेश्वर वाल्हेकर, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद

५) 'आदिवासी साहित्य : स्वरुप आणि समीक्षा' : डॉ.तुकाराम विनायक, विजय प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर